# उपकारस्तुती २०२४

प्रिय बंधूनों आणि भगिनींनो,

ज्या वेळेस आम्हाला एखादी गोष्ट दिली जाते, त्यावेळेस आम्ही ‘‘धन्यवाद’’ असे म्हणावे हे आमच्या आई-वडिलांनी आम्हाला आम्ही मोठे होत असताना शिकवले, ते यासाठी की आमच्याकडे जे काही आहे त्याची किंमत आम्ही ओळखावी आणि त्याचा आदर करावा. या वेगवान जगात, आम्ही एका आठवड्यातून दुसऱ्या आठवड्यात आणि प्रसंगाकडून दुसऱ्या प्रसंगाकडे जात आहोत. असे दिसते की आमच्या जीवनातील घटनांचा आस्वाद घेण्यासाठी, आमच्या अनुभवांवर पूर्ण विचार करण्यासाठी, आणि आमच्या हातात असणाऱ्या छोट्या संधींची किंमत ओळखण्यासाठी देखील आम्ही क्वचितच वेळ देतो.

रविवार, ६ अक्टोंबर २०२४ रोजी आपल्या चर्चचा उपकारस्तुतीचा दिवस आहे, त्याकडे वाटचाल करत असताना, चला आम्ही देवाने आमच्यासाठी केलेल्या उत्कृष्ट आणि आश्चर्यकारक गोष्टींची दखल घेण्यासाठी थोडा अवधी थांबूया (१ इतिहास १६: १२). देवाने आम्हाला जीवन दिले आहे. आम्ही त्याच्या महान निर्मितीचा भाग आहोत. देव हा प्रभू आहे आणि तो त्याच्या निर्मितीची सतत काळजी वाहतो. देव आम्हावर प्रीती करतो, तो मानवांना एकटे टाकून देत नाही आणि आमच्या कृती लक्षात न घेता तो आम्हावर सतत दया दाखवतो. आम्ही देवाच्या प्रीतीवर कृपेवर आणि विश्वासूपणावर अवलंबून राहू शकतो.

न्यू अपोस्टोलीक चर्चच्या गीत संग्रहातील गीत क्रमांक १७७ (२५० गाण्यांचा गीतसंग्रह असलेल्या भारतीय पुस्तकातील गीत क्र. ६३) ‘‘पाहा मोजुनी ते उपकार पाहा देवकृतीही अपार’’ हा आमच्यासाठी एक चांगला उपदेश आहे, हे ओळखणे की सर्वकाही देवाकडून आलेले आहे आणि आम्ही पूर्णपणे त्याच्यावर अवलंबून आहोत. जरी आमचे जीवन एकमेकांपेक्षा खूप वेगळे असले तरीही, आपण एकाच निर्मितीचा भाग आहोत, आपल्या सर्वांना देणग्या मिळालेल्या आहेत आणि आपण देवाची प्रीती, त्याची कृपा आणि त्याचा विश्वासूपणा अनुभवतो, की जे आपल्यासाठी पुरेसे आहे. तो आमच्या तारणाची आणि आमच्यासह सार्वकालिक सहभागितेची इच्छा बाळगतो. या व्यतिरिक्त, आम्हांतील प्रत्येकजण आपल्या जीवनातील इतर अनेक अशिर्वादांचा देखील उल्लेख करू शकतो.

आपण आभार मानणे, गौरव करणे आणि उपकारस्तुती करणे यासाठी प्रवृत्त होतो कारण आपण त्रैक्य देवाची उपासना करतो. आपण दानार्पण देणे, सुवार्तेचा प्रसार करणे, देवाच्या कार्यात सेवा करणे, आमच्या शेजाऱ्याला वाटा देणे आणि निर्मिती आणि आमचे कुटुंब याकरीता जबाबदारीने वागणे याद्वारे आमची उपकारस्तुती प्रकट करू शकतो.

आमच्या विश्वासाच्या ध्येयाकडे आम्ही विनम्रतेने, संयमाने, प्रीतीने, आणि उपकारस्तुतीने, वाटचाल करत आहोत ते म्हणजे: प्रभू येशू ख्रिस्ताचे पुनरागमन.

तुमचे कुटुंब आणि मंडळी यासह आनंदामध्ये आणि शांतीमध्ये हा उपकारस्तुतीचा दिवस तुम्हाला आशिर्वादित जावो, अशी कॅनडा विभागातील प्रेषित आणि बिशप आम्ही सर्वजण एकत्रितपणे शुभेच्छा देतो.

आपला विश्वासू

मार्क वोल